सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमूद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.विचौअ-१६२५/प्र.क्र.०५ /विचौ-२ दि.१३ मार्च २०२५

**विषय** :- विभागीय चौकशी करण्यासाठी कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकारी यंत्रणेच्या सक्षमीकरणासंदर्भातील एकत्रित सूचना

******

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र शासन,वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२५/प्र.क्र०४/२५/कोषा.प्रशा.५, दि.१० मार्च २०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०३१३१४५५३३४००७ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णय नुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी .

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 17-03-2025 23:18:13

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना / आर्थिक गुन्हे / नियोजन व समन्वय / दहशतवाद विरोधी पथक / विशेष कृती / लोहमार्ग / प्रशासन / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / नागरी हक्क संरक्षण / सायबर सुरक्षा/ रा.रा.पो.बल/ सायबर सुरक्षा/ महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग ), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून).
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन / प्रशिक्षण व खास पथके),महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता / धोरण / नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी का .क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**विभागीय चौकशी करण्यासाठी कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकारी यंत्रणेच्या सक्षमीकरणासंदर्भातील एकत्रित सूचना**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: विचौअ-१६२५/प्र.क्र.०५/विचौ-२**
मंत्रालय, मुंबई -४०००३२
दिनांक —१३ मार्च, २०२५

पहा :- १)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसपीओ-२८०४/प्र.क्र.११/२००४/११-अ, दि.२६.०५.२००६
२)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसपीओ-२८०७/प्र.क्र.२१/०७/११-अ, दि.२८.१०.२००९
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण -१०१४/प्र.क्र.५५/११-अ, दि.१६.०२.२०१५
४)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: विचौअ-१६१८/प्र.क्र.१२/११-अ, दि.२१.०५.२०१८
५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: विचौअ-१६२१/प्र.क्र.२१/११-अ, दि.२०.०६.२०२२
६) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५७/विचौ-२, दि.०६.११.२०२४
७) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: वशिअ-१३२४/प्र.क्र.३०/विचौ-२, दि.१२.०३.२०२५

**प्रस्तावना :-**

राज्य शासन सेवेतील अधिकारी/कर्मचारी (गट-अ ते गट-ड) यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अंतर्गत करण्यात येणाऱ्या शिस्तभंगविषयक कार्यवाही दरम्यानची विभागीय चौकशी प्रकरणे पूर्ण करण्यासाठी कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकाऱ्यांची यंत्रणा वरील संदर्भ क्र.१ ते ५ येथील शासन निर्णयांन्वये निर्माण करण्यात आली असून, त्यानुसार सध्या कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकाऱ्यांच्या, गट-अ आणि गट-ब तसेच गट-क आणि गट-ड अशा २ यादया (पॅनल्स) अस्तित्वात आहेत.

राज्यभरातील गट-अ ते गट-ड मधील शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या शिस्तभंगविषयक कार्यवाहीत कंत्राटी चौकशी अधिकारी यंत्रणा हा महत्त्वाचा घटक आहे. तथापि, सद्यस्थितीत पुरेशा नियंत्रणाअभावी सदर यंत्रणेचा पुरेपूर वापर सक्षम शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांकडून करण्यात येत नाही. परिणामी प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकाऱ्यांकडील भार वाढत असून चौकशी प्रकरणे दिर्घकाळ प्रलंबित रहात आहेत. काही प्रसंगी न्यायालयीन प्रकरणे उद्भवत आहेत. या पार्श्वभूमीवर, संदर्भ क्र. १ ते ५ येथील शासन निर्णयांतील कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकारी यंत्रणेसंदर्भातील तरतूदी अधिक्रमित करुन, या यंत्रणेच्या सक्षमीकरण व संनियंत्रणाच्या अनुषंगाने उपाय योजण्याचे तसेच नियुक्तीचे निकष ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्यातील शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्दच्या शिस्तभंगविषयक प्रकरणांतील विभागीय चौकशा कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकारी यंत्रणेकडूनदेखील करुन घेण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून, त्याअनुषंगाने शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांच्या **गट-अ, गट-ब आणि गट-क/ड** याप्रमाणे ३ स्वतंत्र याद्या (पॅनल्स) सामान्य प्रशासन विभागाकडून प्रसिध्द करण्यात येतील व आवश्यकतेनुसार या यादया वेळोवेळी सुधारण्यात येतील.

**अ**) या यादीत (पॅनलवर) **नियुक्तीचे निकष** पुढीलप्रमाणे :-

१. कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकाऱ्यांच्या पॅनलवर नियुक्तीसाठी अर्ज करणारे अधिकारी हे **शासन सेवेतून** (गट-अ किंवा गट-ब) **राजपत्रित पदावरुन निवृत्त झालेले असावेत.**

२. सेवेत असताना किंवा सेवानिवृत्त होताना/झाल्यावर त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी/न्यायीक कार्यवाही झालेली नसावी.

३. शारिरीक, मानसिक आरोग्याच्यादृष्टीने सक्षम असावेत.

४. चौकशीच्या कामात व्यत्यय येईल अशा इतर सेवेत/ व्यवसायात गुंतलेले नसावेत.

५. जाहिरातीच्या दिनांकास अर्जदाराचे वय ६५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.

**ब) गटनिहाय पॅनलवर नियुक्तीचे अन्य निकष पुढीलप्रमाणे** -

| यादीचा गट (पॅनल) | नियुक्तीसाठी निकष | इतर सूचना |
|---|---|---|
| **गट-अ ची यादी (पॅनल)** (रु.७६०० पेक्षा कमी ग्रेड वेतन/एस-२५ पेक्षा कमी वेतनस्तर असलेल्या **गट-अ** मधील **राजपत्रित** अधिकाऱ्यांविरुध्दच्या विभागीय चौकशीची प्रकरणे ) | १) मंत्रालयीन सह/उपसचिव वा समकक्ष अथवा त्यापेक्षा वरीष्ठ वेतनश्रेणी असलेल्या राज्य शासन सेवेतील (गट-अ) राजपत्रित पदावरुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी<br>२) सेवानिवृत्तीच्या वेळी वेतनश्रेणी - सहाव्या वेतन आयोगानुसार किमान ग्रेड वेतन ७६०० अथवा त्यापेक्षा अधिक असावे किंवा सातव्या वेतन आयोगानुसार किमान एस-२५ अथवा त्यापेक्षा वरिष्ठ वेतनस्तर असावा. | गट-अ च्या पॅनलमधील अधिकाऱ्यांना (एकत्रित/ संयुक्त प्रकरणांव्यतिरिक्त) गट-ब, गट-क आणि गट-ड ची प्रकरणे स्विकारता येणार नाहीत. |
| **गट-ब ची यादी (पॅनल)** (**गट-ब** मधील **राजपत्रित** अधिकाऱ्यांविरुध्दच्या विभागीय चौकशीची प्रकरणे) | १) राज्य शासन सेवेतील (गट-अ) राजपत्रित पदावरुन सेवानिवृत्त झालेले असावेत.<br>२) सेवानिवृत्तीच्या दिनांकास सहाव्या वेतन आयोगानुसार कमाल ग्रेड वेतन ६९०० किंवा सातव्या वेतन आयोगानुसार कमाल वेतनस्तर एस-२४ असावा. | गट-ब च्या पॅनलमधील अधिकाऱ्यांना (एकत्रित/ संयुक्त प्रकरणांव्यतिरिक्त) गट-क/ड ची प्रकरणे स्विकारता येणार नाहीत. |
| **गट-क/ड ची यादी (पॅनल)** गट-ब अराजपत्रित, गट-क आणि गट-ड मधील कर्मचाऱ्यांविरुध्दची विभागीय चौकशीची प्रकरणे | १) राज्य शासन सेवेतील (गट-अ/ब) राजपत्रित पदावरुन सेवानिवृत्त झालेले असावेत.<br>२) सेवानिवृत्तीच्या दिनांकास सहाव्या वेतन आयोगानुसार कमाल ग्रेड वेतन ५४०० किंवा सातव्या वेतन आयोगानुसार कमाल वेतनस्तर एस-२० असावा . | गट-क/ड च्या पॅनलमधील अधिकाऱ्यांना गट-अ आणि गट-ब ची प्रकरणे स्विकारता येणार नाहीत. |

**क) नियुक्तीसाठी अर्ज करण्याबाबतची कार्यपध्दती** :-

१. अर्जदारांनी, ते ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले, त्या कार्यालय प्रमुखांमार्फत त्यांच्या संबंधित प्रशासकीय विभागास अर्ज सादर करणे आवश्यक राहील. अर्जाचा नमुना या परिपत्रकासोबतच्या विवरणपत्र – १ मध्ये देण्यात आला आहे.

२. प्रशासकीय विभागप्रमुखांनी, या परिपत्रकासोबतच्या विवरणपत्र-२ नुसार विहित विवरणपत्रातील माहिती स्वाक्षांकित करुन सामान्य प्रशासन विभागाला पाठविणे अनिवार्य राहील.
३. ऑनलाईन/प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल.
४. एका चौकशी अधिकाऱ्याला एकापेक्षा अधिक महसूली विभागांतील प्रकरणे स्विकारता येतील, मात्र याबाबतचा विकल्प नियुक्तीपूर्वी देणे आवश्यक राहील.
५. गटनिहाय यादीत (पॅनलमध्ये) नाव समाविष्ट करण्याचा अंतिम अधिकार सामान्य प्रशासन विभागाचा राहील.

२. **अटी व शर्ती** :- शिस्तभंगविषयक प्राधिकारी यांनी कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यासंदर्भातील तसेच चौकशी अधिकाऱ्यांनी प्रकरणे स्विकारण्यासंदर्भातील अटी व शर्ती या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्र -३ मध्ये नमूद केल्या आहेत.

३. **मानधनाचे दर**:- कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या ठोक परिश्रमिकाच्या (मानधन व भत्ते) तत्वावर विहित दराने कराव्यात. त्यांच्या परिश्रमिकापोटी येणारा सर्व खर्च संबंधित प्रशासकीय विभाग/शिस्तभंगविषयक प्राधिकारी यांनी त्यांच्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागवावा. याबाबतच्या तपशीलवार सूचना या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्र -४ मध्ये नमूद केल्या आहेत.

४. **चौकशी अधिकाऱ्यास एकावेळी १२ प्रकरणे हाताळण्याची मुभा राहिल**. शासकीय पॅनलमधील कंत्राटी चौकशी अधिकाऱ्यांना बिगरशासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांची ६ पेक्षा अधिक प्रकरणे स्विकारता येणार नाहीत. (एकूण १२ प्रकरणांच्या मर्यादेत) तसेच त्यांना अनुज्ञेय करण्यात आलेल्या गटाव्यतिरिक्त इतर गटातील बिगरशासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांची प्रकरणे स्विकारता/हाताळता येणार नाहीत.

५. **यादीतून नाव कमी करणे/वगळणे** :-

**१.** यादीत (पॅनल) नियुक्त होणाऱ्या अधिकाऱ्याची नियुक्ती प्रथमत: ३ वर्षांकरीता असेल.
**२.** नियुक्तीनंतर दर ३ वर्षांनी चौकशी अधिकारी यांच्या कामाचा आढावा घेऊन, त्यांची नियुक्ती पुढील ३ वर्षांसाठी चालू ठेवण्यात येईल.
**३.** वेळोवेळी घेतलेल्या आढाव्याअंती अशी नियुक्ती जास्तीत जास्त त्यांच्या वयाची ७० वर्षे पूर्ण होईपर्यंत चालू राहील.
**४.** वयाची ७० वर्षे पूर्ण केलेल्या अधिकाऱ्याचे नाव यादीतून आपोआप कमी झाल्याचे मानण्यात येईल. यासाठी स्वतंत्र आदेश निर्गमित केले जाणार नाहीत. कार्यकाळ पूर्ण केलेल्या/यादीतून नाव वगळलेल्या अधिकाऱ्यांना चौकशी प्रकरणे स्विकारता येणार नाहीत.
**५.** कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वी ६ महिन्यांच्या कालावधीत चौकशी अधिकाऱ्यांनी नविन प्रकरणे स्विकारु नयेत. स्विकारल्यास, कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वी संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यास चौकशी अहवाल सादर करावेत. अपवादात्मक परिस्थितीत अहवाल सादर करणे शक्य नसल्यास, अशी प्रकरणे पुढील २ महिन्यांत पूर्ण करुन अहवाल सादर करणे आवश्यक राहिल.

**६.** सध्या यादीत असलेल्या अधिकाऱ्यांबाबतदेखील वरीलप्रमाणे दर ३ वर्षांनी आढाव्याअंती नियुक्ती पुढे चालू ठेवण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

**७.** चौकशी अधिकाऱ्याला उचित कारणाशिवाय (त्यांच्याकडे विहित प्रमाणात प्रकरणे सुरु असल्याचे खेरीज करुन) चौकशी प्रकरण नाकारता येणार नाही.

**८.** चौकशी अधिकाऱ्याने वैयक्तिक कारणास्तव प्रकरणे नाकारु नयेत. विहित मर्यादेपेक्षा अधिक प्रकरणे स्विकारल्यास अथवा त्यांच्याकडे १२ पेक्षा कमी प्रकरणे सुरु असताना त्यांनी प्रकरण नाकारल्याचे निदर्शनास आल्यास, त्यांचे नाव यादीतून कमी करण्यात येईल.

**९.** चौकशी अधिकाऱ्यांकडून प्राप्त अहवालांचा दर्जा समाधानकारक नसल्याबाबतचा अहवाल/प्रस्ताव/गंभीर स्वरुपाची तक्रार शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने पुराव्यांसहीत सादर केल्यास, चौकशी अधिकाऱ्याचे नाव यादीतून कमी करण्याबाबतचा निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या स्तरावरुन घेण्यात येईल.

**१०.** चौकशी अधिकाऱ्याविरुध्द प्राप्त गंभीर स्वरुपाच्या तक्रारीत सकृतदर्शनी तथ्य आढळून आल्यास व त्या चौकशीपासून चौकशी अधिकाऱ्याने तात्काळ दूर होणे उचित राहील, अशी या विभागाची खात्री झाल्यास, अशा कोणत्याही वेळी, कोणतेही कारण/नोटीस न देता, संबंधित चौकशी अधिकाऱ्याचे नाव यादीतून वगळण्याचे अधिकार सामान्य प्रशासन विभाग राखून ठेवत आहे.

**११.** ज्या अधिकाऱ्याकडे वर्षभरात एकही प्रकरण प्राप्त झाले नसेल अथवा ज्यांचे सलग ४ त्रैमासिक अहवाल "निरंक" असतील, अशा अधिकाऱ्याचे नाव यादीतून कमी करण्यात येईल.

६. **सेवेतील अधिकाऱ्याकडून चौकशी पूर्ण करुन घेणे:-** काही अपवादात्मक विभागीय चौकशीच्या प्रकरणांतील गांभीर्य/तातडी पाहता, शासन सेवेत कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांकडून चौकशी करवून घेणे आवश्यक असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास, अशी चौकशी सेवारत अधिकाऱ्यांना त्या प्रकरणासाठी विभागीय चौकशी अधिकारी नेमून अशा अधिकाऱ्यांकडून चौकशी करुन घेण्यास प्रत्यवाय नाही. मात्र, खालील अटी व शर्तींची पूर्तता होणे आवश्यक राहील :-

क) वरीलप्रमाणे सेवेतील अधिकाऱ्याची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करताना, प्रकरणाचे गांभीर्य/तातडी नमूद करुन प्रस्तावास सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता मिळवावी.

ख) अशी नियुक्ती करताना, या शासननिर्णयातील पहिल्या परिच्छेदातील "ब" येथील तक्त्यात दर्शविल्यानुसार गटनिहाय नियुक्तीचे निकष विचारात घेणे आवश्यक राहील.

ग) या चौकशी अधिकाऱ्यांचा उक्त चौकशी प्रकरणामध्ये कोणताही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संबंध आलेला नसावा व तसे शपथपत्रही सदर अधिकाऱ्याकडून शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने प्राप्त करुन घ्यावे.

सातव्या वेतन आयोगानुसार एस-२४ (सहाव्या वेतन आयोगानुसार रु.६९००/- ग्रेड पे) व त्यापेक्षा कमी वेतनस्तरात वेतन घेण्याऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या विभागीय चौकशी प्रकरणांत वरीलप्रमाणे सेवारत अधिकाऱ्याची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करताना सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीची आवश्यकता राहणार नाही.

७. प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांचेकडे विभागीय चौकशीची प्रकरणे सोपविण्याची सध्या अंमलात असलेली कार्यपध्दती यापुढेही सुरु राहील.

८. पॅनलमध्ये नाव नसलेल्या (नाव वगळलेल्या/कमी केलेल्या) अधिकाऱ्यांनी चौकशीचे प्रकरण स्विकारु नये. प्रकरण सोपविले गेल्यास व अशा प्रकरणांत काही आकस्मिकता/तक्रार/न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी, संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांची तसेच चौकशी प्रकरण स्विकारणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याची राहील.

९. या शासन निर्णयान्वये विहित केलेले निकष व सूचना विचारात घेऊन, कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकाऱ्यांच्या गटनिहाय (गट-अ, गट-ब आणि गट-क/गट-ड) स्वतंत्र याद्या (पॅनल्स) पुढील ३ महिन्यांत प्रसिध्द करण्यात येतील.

१०. सध्या कार्यरत चौकशी अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे सुरु असलेली, इतर गटातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची प्रकरणे पुढील ३ महिन्यांत पूर्ण करुन संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांना अहवाल सादर करावेत. सुधारित यादया निर्गमित झाल्यानंतर त्यांना नेमून दिलेल्या गटाव्यतिरिक्त इतर गटातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची चौकशी प्रकरणे स्विकारता येणार नाहीत.

११. चौकशी अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतच्या सूचना संदर्भ क्र.७ येथील या विभागाच्या दि.१२.०३.२०२५ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. सदर सूचनांचे काटेकोर पालन करुन विहित कार्यपध्दतीनुसार चौकशीची कार्यवाही पार पाडावी.

१२. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी या सूचना त्यांच्या आधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणाव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०२५०३१३१४५५३३४००७ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUCHITA MOHAN MAHADIK

Digitally signed by SUCHITA MOHAN MAHADIK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=6578e224c4a0d2c9bfb7e7e33b474757c1425d0a03e653bc4f0a25b70698158e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E146A6DDC8FB6681D49A5099661D41639DA6C568419F071BB9CDFD8A2E08058C, cn=SUCHITA MOHAN MAHADIK
Date: 2025.03.13 14:59:29 +05'30'

**(सुचिता महाडिक)**
**सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग**

प्रति,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव,
४. मा. उपमुख्यमंत्री (न.वि.वि.) यांचे सचिव,

५. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव,
६. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव,
७. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव,
८. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव,
९. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा,
१०. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद,
११. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
१२. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव,
१३. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
१४. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१५. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
१८. मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद
१९. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२०. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
२१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
२२. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
२३. सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
२४. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग/कार्यालय प्रमुख,
२५. सर्व विधीमंडळ सदस्य,
२६. निवडनस्ती (विचौ-२)

शासन निर्णय क्रमांक विचौअ -१६२५/प्र.क्र.०५/विचौ-२ , दिनांक-१३ फेब्रुवारी, २०२५ सोबतचे विवरणपत्र

## विवरणपत्र १

### कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकाऱ्यांच्या यादीत (पॅनलवर) नियुक्तीसाठी शासन सेवेतून (राजपत्रित पदावरुन) निवृत्त झालेल्या इच्छुक अधिकाऱ्यांनी सादर करावयाच्या अर्जाचा विहित नमुना

१. अधिकाऱ्याचे नाव:-

२. जन्मदिनांक:-

३. सेवानिवृत्तीचा दिनांक:-

४. सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद:-

५. सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेल्या पदाचे ग्रेड वेतन / सातव्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर :-

६. ज्या विभागातून सेवानिवृत्त झाले तो विभाग/कार्यालय :-

७. संबंधित प्रशासकीय विभाग:-

८. सध्याचा निवासी पत्ता:-

९. मोबाईल क्रमांक:-

१०. ई मेल आयडी :-

११. सेवेत असताना चौकशीची प्रकरणे हाताळली आहेत का :-

१२. सेवेत असताना शिक्षा झालेली आहे का :-

१३. चौकशी अधिकारी म्हणून कोणत्या महसूली विभागात काम करावयाचे आहे:-

**सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे नाव व स्वाक्षरी**

-*-*-

शासन निर्णय क्रमांक विचौअ -१६२५/प्र.क्र.०५/विचौ-२ , दिनांक १३ मार्च, २०२५ सोबतचे विवरणपत्र

## विवरणपत्र -२

## कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकारी पदावरील नियुक्तीकरीता इच्छुक अधिकाऱ्याची माहिती

| अ. क्र. | सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे पूर्ण नाव व जन्मदिनांक | सेवानिवृत्त अधिकाऱ्याचा निवासी पत्ता व दूरध्वनी क्रमांक | सेवानिवृत्त होताना धारण केलेले पद व सहाव्या वेतन आयोगानुसार ग्रेड वेतन/ सातव्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर | सेवानिवृत्तीचा दिनांक | सेवेत कार्यरत असताना किंवा सेवानिवृत्त होताना त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी/न्यायिक कार्यवाही सुरु होती किंवा कसे (असल्यास तपशील द्यावा), विभागीय चौकशी/न्यायिक कार्यवाहीत शिक्षा झाली होती किंवा कसे (असल्यास तपशील द्यावा) | सेवेत कार्यरत असताना त्यांनी विभागीय चौकशीचे काम हाताळले आहे किंवा कसे | सेवेत असताना काम केलेले प्रशासकीय विभाग | कोणत्या महसूली विभागांत काम करण्याची इच्छा आहे ? |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

स्वाक्षरी व नाव (क.अ./अ.स.)
प्रशासकीय विभागाचे नाव

शासन निर्णय क्रमांक विचौअ -१६२५/प्र.क्र.०५/विचौ-२ , दिनांक- १३ मार्च, २०२५ सोबतचे विवरणपत्र

## विवरणपत्र - ३

**शिस्तभंगविषयक प्राधिकारी यांनी कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबत तसेच चौकशी अधिकाऱ्यांनी प्रकरणे स्विकारण्यासंदर्भातील सूचना -**

१. चौकशी कामासाठी नियुक्त करावयाच्या कंत्राटी तत्वावरील सेवानिवृत्त अधिकाऱ्यास " चौकशी अधिकारी " असे संबोधण्यात यावे.

२. चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करताना, असा अधिकारी, अपचारी अधिकारी/ कर्मचारी यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या पदावरुन सेवानिवृत्त झाला असल्याची तसेच संयुक्त चौकशीमध्ये तो ज्येष्ठतम अपचारी अधिकाऱ्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचा असल्याची खातरजमा शिस्तभंगविषयक प्राधिकारी यांनी करावी.

३. शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांनी चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करताना प्रकरणातील अपचारी अधिकारी/कर्मचाऱ्याचा संवर्ग, गट, वेतनस्तर इ. बाबी तपासून संबंधित यादीतील (पॅनल) चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करावी.

४. चौकशी अधिकाऱ्यास एकावेळी १२ प्रकरणे हाताळण्याची मुभा राहिल. त्यांच्याकडे सुरु असलेल्या प्रकरणांचा त्रैमासिक अहवाल शासनास न चूकता सादर करावा. (एकही प्रकरण प्राप्त नसेल तरी “निरंक” अहवाल सादर करावा.)

५. पॅनलवरील सर्व चौकशी अधिकाऱ्यांकडे सुरु असलेल्या प्रकरणांची आकडेवारी DE Module मध्ये अपडेट करण्यात येईल.

६. शिस्तभंगविषयक प्राधिकारी यांनी कंत्राटी चौकशी अधिकाऱ्यांकडे प्रकरणे सोपविण्यापूर्वी संबंधित अधिकाऱ्यांकडे किती प्रकरणे सुरु आहेत, याबाबत DE Module मधून माहिती घेऊन तद्नंतर प्रकरणे सोपवावीत. चौकशी अधिकाऱ्याने प्रकरण स्विकारण्यास नकार दिल्यास, अशी बाब तात्काळ सामान्य प्रशासन विभागाच्या निदर्शनास आणून दयावी.

७. कंत्राटी चौकशी अधिकारी म्हणून नेमावयाच्या अधिकाऱ्यांनी ते ज्या प्रकरणी विभागीय चौकशी करणार आहेत, त्या चौकशी प्रकरणामध्ये त्यांचा कोणत्याही प्रकारे अपचारी वा प्रकरणाशी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संबंध आलेला नाही व त्या चौकशी प्रकरणामध्ये कोणत्याही प्रकारचे हितसंबंध नाहीत, असे शपथपत्र देणे बंधनकारक राहील.

८. चौकशी अधिकाऱ्याने चौकशी प्रकरणासंदर्भात त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती/आधार सामग्रीबाबत गोपनीयता बाळगावी आणि त्याचा वापर केवळ त्यांना सोपविण्यात आलेल्या प्रकरणाच्या चौकशीसाठीच करावा.

९. चौकशी अधिकारी यांनी चौकशी कामकाज चालू असताना किंवा चौकशी अहवाल सादर केल्यानंतर अशी कोणतीही कागदपत्रे/ माहिती किंवा आधार सामग्री उघड करता कामा नये. चौकशी अधिकाऱ्याने त्यांना सोपविलेल्या चौकशी प्रकरणाच्या सर्व नोंदी / कागदपत्रे / कामकाज इ. बाबत गुप्तता व गोपनीयता बाळगावी.

१०. चौकशी अधिकाऱ्यांनी चौकशी अहवाल सादर करताना त्या प्रकरणाच्या सर्व नोंदी, अहवाल इत्यादी सर्व संबंधित दस्तावेज अहवालासोबत, त्यांना चौकशी अधिकारी म्हणून नेमणाऱ्या प्राधिकाऱ्याकडे सोपवावीत.

११. चौकशीचे कामकाज विभागाच्या/कार्यालयाच्या मुख्यालयात किंवा प्रभारी अधिकाऱ्याच्या, साक्षीदार असलेल्या ठिकाणीच पार पाडण्यात यावे. अपवादात्मक किंवा टाळता न येणाऱ्या परिस्थितीत चौकशी कामानिमित्ताने चौकशी अधिकारी यांना प्रवास करावा लागल्यास सेवेत समकक्ष पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना देय असणाऱ्या दराप्रमाणेच चौकशी अधिकारी यांना प्रवासभत्ता / दैनिक भत्ता देय राहील.

१२. प्रकरणे सोपविणाऱ्या विभाग/कार्यालय यांच्या कार्यालयाच्या आवारातच चौकशी अधिकारी यांनी त्यांच्याकडे सोपविलेल्या चौकशीचे कामकाज पार पाडावे.

१३. चौकशी सोपविणाऱ्या विभाग/कार्यालयाने चौकशी अधिकारी यांना चौकशीच्या कामकाजासाठी आवश्यक फर्निचर व कुलुपे असलेली कपाटे पुरवावीत.

१४. चौकशी सोपविणाऱ्या विभाग/कार्यालयाने चौकशी अधिकारी यांना चौकशीच्या कामकाजासाठी आवश्यक स्टेशनरी / पोस्टेज तिकिटे पुरवावीत.

१५. नियुक्ती प्राधिकरणास कामकाजाच्या कोणत्याही वेळी, कोणतेही कारण न देता आणि कोणतीही नोटीस न देता चोकशी अधिकारी यांची सेवा समाप्त करता येईल. तथापि, अशी कार्यवाही करण्याची आवश्यकता का निर्माण झाली याबाबतच्या समर्थनीय कारणांसह संबंधित चौकशी अधिकाऱ्यास तसेच सामान्य प्रशासन विभागास कळविणे आवश्यक राहील.

१६. संदर्भ क्र. ६ येथील शासन परिपत्रक, सा.प्र.वि., दि.०६.११.२०२४ मधील सूचनांनुसार शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने चौकशी अधिकाऱ्याकडे प्रकरण सोपवावे. चौकशी अधिकारी यांनी संपूर्ण कागदपत्रांसह प्रकरण स्विकारल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत चौकशीचे कामकाज पूर्ण करुन संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यास चौकशी अहवाल सादर करावा. (दि.०६.११.२०२४ च्या शासन परिपत्रकाची प्रत सोबत उपलब्ध केली आहे.)

१७. अपवादात्मक प्रकरणी योग्य ती कारणमिमांसा नमूद करुन चौकशी अधिकारी यांना शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांकडून तीन महिन्यांची मुदतवाढ घेता येईल.

१८. कंत्राटी चौकशी अधिकारी यांनी चौकशी प्रकरणांचा प्राथम्यक्रम, न्यायालयीन प्रकरणे, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची प्रकरणे, १ वर्षाच्या आत सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यांची प्रकरणे व सर्वसाधारण प्रकरणे, असा ठेवून त्यानुसार प्रकरणे निकाली काढावीत.

१९. कंत्राटी चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालांची छाननी/मुल्यांकन संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांनी करणे आवश्यक आहे. या मुल्यांकनाअंती चौकशी अधिकाऱ्याच्या अहवालाचा दर्जा योग्य प्रतीचा नसल्याचे शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याच्या निदर्शनास आल्यास व त्याला पॅनलवरुन निष्काषित करणे उचित राहिल, असे वाटत असल्यास त्याबाबतचा अहवाल शिस्तभंगविषयक प्राधिकारी यांनी सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावा.

२०. चौकशी अधिकारी आणि शिस्तभंगविषयक प्राधिकारी यांच्या दरम्यान मतभेद निर्माण झाल्यास अथवा काही प्रश्न उद्भवल्यास त्याबाबत सामान्य प्रशासन विभागास प्रस्तावित करावे. अशा प्रस्तावांवर सामान्य प्रशासन विभागाने दिलेला निर्णय अंतीम राहील.

-*-*-

शासन निर्णय क्रमांक विचौअ -१६२५/प्र.क्र.०५/विचौ-२ , दिनांक-१३ मार्च, २०२५ सोबतचे विवरणपत्र

# विवरणपत्र - ४

## कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकाऱ्यांना अदा करावयाच्या मानधन दर व अनुषंगिक सूचना

| अ.क्र. | **मानधन/बाब** | **गट-अ चे पॅनल रुपये** | **गट-ब चे पॅनल रुपये** | **गट-क आणि गट-ड चे पॅनल रुपये** |
|---|---|---|---|---|
| १ | १ अपचारी असलेल्या प्रकरणी | १८,००० | १८,००० | १२,००० |
| २ | प्रवास भत्ता- (केवळ "अ" आणि "ब" वर्ग दर्जाच्या शहरांकरिता लागू) | १,००० | १,००० | ७५० |
| ३ | चौकशी अधिकाऱ्याने स्वत: नियुक्त केलेल्या लिपिक/टंकलेखक यांच्या सेवेपोटी ठोक रक्कम | ३,००० | ३,००० | २,००० |
| ४ | १ अपचारी असलेल्या प्रकरणातील एकूण मानधन रक्कम | **२२,०००** | **२२,०००** | **१४,७५०** |
| ५ | त्यापुढील प्रत्येक अपचाऱ्यामागे | ३,००० | ३,००० | १,५०० |
| ६ | मानधनाची एकूण **कमाल मर्यादा** | ३०,००० | ३०,००० | २४,००० |

अ) **मानधनासाठी निधीची तरतूद करणे** :-

१) प्रशासकीय विभागांनी तसेच त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयांनी त्यांच्याकडे सध्या सुरु असलेल्या व नव्याने सुरु होणाऱ्या चौकशी प्रकरणांचा (गटवारीनुसार संख्येचा ) अंदाज घ्यावा.

२) त्यापैकी किती प्रकरणांत चौकशी अधिकाऱ्यांची नियुक्ती होणे अपेक्षित आहे याचा अंदाज घेऊन, मानधनाची देय रक्कम निश्चित करावी.

३) त्यानुसार दरवर्षी संबंधित विभाग/कार्यालयांच्या सामाईक (कॉमन) लेखाशिर्षांतर्गत १३-कार्यालयीन खर्च या बाबीखाली अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध करुन घ्यावी.

**चौकशी अहवालासंदर्भातील सूचना** :-

१) चौकशी अधिकाऱ्याने अहवाल सादर केल्यावर तो अहवाल तपासून घ्यावा.

२) चौकशी अधिकाऱ्याने विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन चौकशी पूर्ण केल्याची तपासणी करावी.

३) तसेच चौकशीच्या प्रत्येक टप्प्यावर अपचारी अधिकारी/कर्मचाऱ्यास नैसर्गिक न्यायाची संधी देण्यात आली आहे, याबाबत खात्री करावी.

४) वरीलप्रमाणे उचित कार्यवाही झाली असल्यास, अहवाल स्वीकारावा.

५) दोषारोपातील काही मुद्दयांबाबत अधिक चौकशीची आवश्यकता असल्यास तसे चौकशी अधिकाऱ्यास तात्काळ कळवावे.

६) चौकशीचे कामकाज करताना विहित कार्यपध्दतीचे अनुसरण न करता चौकशी पूर्ण करुन अहवाल सादर केल्याची शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याची खात्री झाली असल्यास, आवश्यकतेनुसार फेरचौकशीबाबतचा निर्णय तात्काळ घ्यावा.

७) त्याच चौकशी अधिकाऱ्याकडून फेरचौकशी करुन घ्यावयाची असल्यास मुद्देनिहाय असहमती कळवून फेरचौकशीचे आदेश दयावेत.

८) यादीतील इतर चौकशी अधिकाऱ्याकडून नव्याने फेरचौकशी करण्याचा निर्णय घेतल्यास, अहवाल सादर केलेल्या चौकशी अधिकाऱ्यास तसे कळविण्यात यावे.

## (ड) चौकशी अधिकाऱ्यांचे मानधन अदा करण्यासंदर्भातील सूचना:-

१. चौकशी अधिकाऱ्याकडून अहवाल प्राप्त झाल्यावर, अहवालाची तात्काळ छाननी करुन, १५ दिवसांत चौकशी अधिकाऱ्याचे मानधन अदा करण्याची कार्यवाही शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांनी करावी.

**२.** चौकशी अहवाल सादर झाल्यापासून मानधन अदा होण्याचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत **३ महिन्यांपेक्षा अधिक असता कामा नये.**

**३.** चौकशी अधिकाऱ्याने सदोष अहवाल सादर केल्यामुळे इतर चौकशी अधिकाऱ्याकडून प्रकरणाची फेरचौकशी करण्याचा निर्णय शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांनी अहवालाच्या छाननीअंती घेतला असल्यास, सदोष अहवाल सादर केलेल्या चौकशी अधिकाऱ्यास मानधन देय असणार नाही.

४. चौकशी अधिकारी हे शासनाचे सेवानिवृत्त अधिकारी असल्याने, मानधनासाठी त्यांना शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याकडे पाठपुरावा करण्याची आवश्यकता भासू नये, याची काळजी चौकशीचे प्रकरण सोपविणाऱ्या अधिकाऱ्याने घ्यावी.

-*-*-

**विभागीय चौकशीची प्रकरणे चौकशी अधिकारी यांच्याकडे पाठविण्याबाबत. नमुना आदेश व तपासणी सूची**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: संकिर्ण २०२४/ प्र.क्र.५७/विचौ-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगूरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: ०६ नोव्हेंबर, २०२४

**शासन परिपत्रक :-**

शासकीय कर्मचाऱ्यांविरूध्द विभागीय चौकशी करण्याचा निर्णय झाल्यावर त्याला विहित नमुन्यातील दोषारोपाचे ज्ञापन व त्यासोबत दोषारोपाच्या बाबी, गैरवर्तुणक/गैरवर्तनाच्या आरोपांचे विवरणपत्र, साक्षीदारांची यादी व पुराव्यांच्या कागदपत्रांची यादी अशी चार जोडपत्रे पाठविण्यात येतात. ही जोडपत्रे तयार करणे ही शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याची जबाबदारी आहे. दोषारोपाच्या ज्ञापनासोबतची जोडपत्रे निर्दोष व परिपूर्णरित्या तयार करण्याबाबतच्या सूचना विभागीय चौकशी नियमपुस्तिका, १९९१ च्या परिच्छेद -६.४ ते ६.८ मध्ये दिल्या आहेत.

तथापि, काही प्रकरणी चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती केल्यानंतर बऱ्याच कालावधीनंतर संबंधित कागदपत्रे चौकशी अधिकाऱ्याकडे पाठविण्यात येतात. तसेच, जोडपत्र तयार करताना शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांकडून पुरेशी दक्षता घेतली जात नाही. जोडपत्रांत त्रुटी राहिल्याने चौकशीच्या प्रकियेत अडथळा निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे. चौकशी अधिकाऱ्यांना त्यांच्या नियुक्तीच्या आदेशांसोबत सर्व कागदपत्रे उपलब्ध करून दिली जात नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे चौकशी अधिकारी अशी प्रकरणे संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याकडे कागदपत्रांची पुर्तता करण्यासाठी परत पाठवितात. परिणामी चौकशी पूर्ण होण्यास विलंब होतो.

२. चौकशी संबंधित दस्तऐवज व मूळ कागदपत्रे चौकशी अधिकाऱ्यांकडे पाठविताना सुरवातीलाच काळजी घेतली तर कालापव्यय टाळून चौकशी प्रकरणे विहित कालावधीत निकाली काढण्यास मदत होते. सबब विभागीय चौकशीची प्रकरणे, चौकशी अधिकाऱ्यांकडे चौकशीसाठी सुपूर्द करतांना संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकारी यांचेकडून सर्व बाबींची पूर्तता करण्याच्या अनुषंगाने उपरोक्त परिस्थिती उद्भवू नये यासाठी तसेच सर्व चौकशी अधिकारी यांना पाठवयाच्या प्रस्तावामध्ये सुसूत्रता येण्यासाठी शिस्तभंग प्राधिकाऱ्यांनी चौकशी अधिकाऱ्यांच्या नियुक्ती आदेशासोबत सोबत जोडलेल्या तपासणी

सूचीसह सर्व संबंधित कागदपत्रे चौकशी अधिकाऱ्यांस पाठविणे आवश्यक आहे. चौकशी अधिकारी यांच्या नियुक्ती आदेशाचा नमुना तसेच तपासणीसूची / कागदपत्रांच्या यादीचा नमुना सोबत जोडला आहे.

चौकशी अधिकाऱ्यांनी त्यांचेकडे प्राप्त होणारी विभागीय चौकशी प्रकरणे विहित तपासणीसूची व त्यासोबतच्या कागदपत्रांसह पाठविण्यात आल्याची खातरजमा करुनच विभागीय चौकशीचे प्रकरण स्विकारावे.

३. **उपरोक्त कार्यपध्दती दि.११.११.२०२४ पासून अनिवार्य करण्यात येत आहे. सदर दिनांकानंतर वरीलप्रमाणे नमुन्यात नसलेले प्रस्ताव संबंधित चौकशी अधिकाऱ्यांनी स्वीकारू नयेत.**

४. सदर शासन परिपत्रक विभागीय चौकशी आज्ञावलीत (DE Module) उपलब्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सुचिता महाडिक)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**सोबत:- वरिलप्रमाणे-२**

**प्रति,**

१. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई- यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक आपल्या विभागातील विभागीय चौकशी विषय हाताळणाऱ्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

२.प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी (कोकण, पुणे, नागपूर,नाशिक, छ.संभाजीनगर, अमरावती)

३.सर्व चौकशी अधिकारी (गट -अ व गट-ब पॅनल तसेच गट- क व गट-ड पॅनल)

**शासन परिपत्रक क्रमांक :संकिर्ण २०२४/प्र.क्र.५७/विचौ-२, दि.०६.११.२०२४ सोबतचे सहपत्र - १**

**परिशिष्ट ३**

(परिच्छेद ३.१६ )

चौकशी अधिकारी नियुक्त करण्यासंबंधीच्या आदेशाचा नमुना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ याचा नियम ८(२)

**"जनहिताय सर्वदा"**

**महाराष्ट्र शासन**

**---------------------विभाग**

पत्ता :-----------------------------------

दुरध्वनी क्र. ❖ ई-मेल –

**क्र.**

**दि.**

## आदेश

श्री. -------------------------------------(शासकीय कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम ) यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ अन्वये चौकशी करण्यात येत आहे.

श्री. ---------------------------------- यांच्याविरुध्द तयार करण्यात आलेल्या आरोपांची तपशिलवार चौकशी करण्याकरिता चौकशी अधिकारी नियुक्त करण्याचा निर्णय सक्षम प्राधिकारी यांनी घेतला असून उक्त नियमांच्या पोट-नियम (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन –

---------------- (प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकाऱ्याचे पदनाम/कंत्राटी चौकशी अधिकारी नेमला असल्यास त्यांचे नाव लिहावे) यांची उक्त श्री.------------------ यांच्याविरुध्द तयार करण्यात आलेल्या दोषारोपांची चौकशी करण्याकरिता "चौकशी अधिकारी" म्हणून नियुक्त करीत आहे. सदर आदेशासोबत सर्व आवश्यक कागदपत्रे जोडण्यात आल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सही)

(नाव)

सक्षम प्राधिकाऱ्याचे पदनाम.

सोबत :- तपासणी सूची व संबंधित कागदपत्रे

प्रति,

चौकशी अधिकाऱ्याचे नाव व पदनाम

प्रत रवाना:-

१) शासकीय कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम

२) सादरकर्ता अधिकाऱ्याचे नाव व पदनाम

शासन परिपत्रक क्रमांक :संकिर्ण २०२४/प्र.क्र.५७/विचौ-२, दि.०६.११.२०२४ सोबतचे सहपत्र - २

## चौकशी अधिकारी यांच्या नियुक्ती आदेशासोबतचे सहपत्र

श्री.------------, पदनाम यांचेविरुध्दच्या विभागीय चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ (६) अनुसार तसेच शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीडीआर-१००९/प्र.क्र.५०/०९/११, दि.१३.०५.२०१० नुसार चौकशी अधिकारी यांना पाठविण्यात येणाऱ्या आवश्यक दस्तऐवजांची यादी पुढीलप्रमाणे:-

**तपासणी सूची:-**

| अ.क्र. | बाबी | शेरा |
|---|---|---|
| १ | प्रस्तुत चौकशी न्यायालयाच्या आदेशानुसार सुरु केली असल्यास आदेशाची प्रत | जोडली आहे.(पृ.---/प.वि.) / लागू नाही. |
| २ | प्रस्तुत प्रकरणी फौजदारी /न्यायालयीन प्रकरण सुरु असल्यास संबंधित याचिकेची प्रत | जोडली आहे.(पृ.---/प.वि.) / लागू नाही. |
| ३ | सादरकर्ता अधिकारी यांच्या नियुक्ती आदेशाची प्रत | जोडली आहे.(पृ.---/प.वि.) |
| ४ | दोषारोपांचे ज्ञापन व त्यासोबतची जोडपत्र १ ते ४ | जोडली आहे.(पृ.---/प.वि.) |
| ५ | दोषारोपाच्या प्रत्येक बाबीची प्रत आणि गैरवर्तुणकीच्या किंवा गैरवर्तनाच्या आरोपांचे विवरणपत्र | जोडली आहे.(पृ.---/प.वि.) |
| ६ | शासकीय कर्मचाऱ्यांने बचावाचे कोणतेही लेखी निवेदन सादर केले असल्यास त्याची प्रत. | जोडली आहे.(पृ.---/प.वि.) / प्राप्त नाही |
| ७ | नियम ८ (६) च्या पोटनियम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या साक्षीदारांनी कोणतीही निवेदने केलेली असल्यास त्याच्या प्रती | जोडली आहे.(पृ.---/प.वि.) / प्राप्त नाही |
| ८ | नियम ८ (६) च्या पोटनियम (३) मध्ये निर्दिष्ट केलेली कागदपत्रे देण्यात आली असल्याचे सिध्द करणारा पुरावा. | जोडली आहे.(पृ.---/प.वि.) |
| ९ | जोडपत्र-४ मधील दस्तऐवज/कागदपत्रांचे सुस्पष्ट व साक्षांकित संच | जोडले आहेत. (पृ.---/प.वि.) |
| १० | जोडपत्र -३ मधील साक्षीदार व जोडपत्र-४ मधील दस्तऐवज कोणत्या दोषारोपांशी संबधित आहेत याचे विवरण<br>दोषारोप क्रमांक \| संबंधित दस्ताऐवज \| संबंधित साक्षीदार<br>१ \| २ \| ३ | विवरणपत्र सोबत जोडले आहे.(पृ.---/प.वि.) |
| ११ | दोषारोप पत्र व त्यासोबतची कागदपत्रे प्राप्त झाल्याबद्दलची अपचारी यांची पोच पावती | जोडली आहे.(पृ.---/प.वि.) |
| १२ | सामाईक कारवाई असेल तर नियम १२ अन्वये दिलेले आदेश | जोडले आहेत.(पृ.---/प.वि.)/ लागू नाही |
| १३ | जोडपत्र- ३ मधील साक्षीदारांचे अद्यावत पत्ते, दूरध्वनी/ भ्रमणध्वनी क्रमांक अथवा सेवानिवृत्त असल्यास त्याच्या घरचा अद्यावत पत्ता, दुरध्वनी क्रमांक यांची यादी | जोडली आहे.(पृ.---/प.वि.) |
| १४ | अपचाऱ्याने दोषारोपपत्रास अनुसरून केलेले कोणतेही निवेदन | जोडले आहे. (पृ.---/प.वि.) /प्राप्त नाही |

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त यादीत नमूद सर्व कागदपत्रे सोबत जोडण्यात आली आहेत.

**(स्वाक्षरी)**
**(नाव)**
संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकारी

**प्रति,**

१) संबंधित चौकशी अधिकारी
२) संबंधित सादरकर्ता अधिकारी.